दाखल दिनांक : १०/१०/२०२२
स्विकारल्याची तारीख : १०/१०/२०२२
न्यायनिर्णय दिनांक : २७/०९/२०२३
कालावधी : व. म. दि.
०० ११ १७

**विदयमान न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मंगरूळपीर जि. वाशिम यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी श्री. आर.एस.मानकर)**

**नियमित फौजदारी प्रकरण क्र.२८५/२०२२** **निशाणी क्र.४१**

सरकार तर्फे
पोलीस स्टेशन अधिकारी,
पोलीस स्टेशन, मंगरूळपीर, ता. मंगरूळपीर,
जि. वाशिम .... अभियोग पक्ष

**—विरुद्ध—**

१) जितेंद्र लक्ष्मण चव्हाण,
वय ३८ वर्षे,व्यवसायः— मजुरी,

२) राज धमेंद्र चव्हाण,
वय १९ वर्षे, व्यवसायः— मजुरी,

३) राहुल धमेंद्र चव्हाण,
वय २० वर्षे, व्यवसायः— मजुरी,

४) धमेंद्र लक्ष्मण चव्हाण,
वय ४६ वर्षे, व्यवसायः— मजुरी,

५) चित्रा धमेंद्र चव्हाण,
वय ४० वर्षे, व्यवसायः— मजुरी,

६) पुजा जितेंद्र चव्हाण,
वय ३७ वर्षे, व्यवसायः— मजुरी,

वरील सर्व राः— जुने सोनखास ता. मंगरूळपीर, जि. वाशिम. ..... आरोपी

**आरोप :—भारतीय दंड संहितेचे कलम १४३, १४७, १४८, ३२४, ५०४ व ५०६ सह कलम १४९ अन्वये.**

---

अभियोग पक्षातर्फे :— श्री. सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एम. जी. राउत
आरोपीतर्फे विधीज्ञ :— श्री. बी. एस. खडसे.

---

## न्यायनिर्णय
## (घोषणा दिनांक २७ सप्टेंबर, २०२३)

**१)** आरोपींविरूध्द मंगरूळपीर पोलीस स्टेशन मार्फत भारतीय दंड विधान कलम १४३,१४७,१४८,३२४,५०४,५०६ सह कलम १४९ नुसार. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले व खटला चालविण्यात आला.

## अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात.

**२)** दि.१२.०५.२०२२ रोजी दुपारी ४.०० वाजताच्या सुमारास फिर्यादी सौ. भारती घनश्याम राठोड ही तिच्या घरी हजर असतांना तिचे पती घनश्याम किसन राठोड यांना मोतीराम चव्हाण यांचा फोन आला की, त्याला जितु चव्हाण, धर्मेंद्र चव्हाण, हे भांडण तंटा करुन मारहाण करीत आहे तुम्ही त्यांना समजाविण्याकरीता या असे म्हटले त्यामुळे फिर्यादी, फिर्यादीचे पती व भासरे असे जांब रोड आय.टी.आय कॉलेजजवळ भांडण सोडविण्यासाठी गेले असता त्यावेळी फिर्यादीचे भासरे राम किसन राठोड व पती घनश्याम किसन राठोड यांना आरोपी धर्मेंद्र चव्हाण, जितेंद्र चव्हाण व चित्रा चव्हाण यांनी लोखंडी गजाने व काठीने मारहाण केली. त्यामुळे फिर्यादीचे भासरे राम किसन राठोड यांच्या डावे कानाजवळ तसेच पाठीवर, पायावर ठिकठिकाणी मार लागला व फिर्यादीचे पती घनश्याम राठोड याला पोटावर, पाठीवर व कंबरेवर मार लागला. तसेच आरोपी राज चव्हाण, राहुल चव्हाण व पुजा चव्हाण यांनी मोतीराम चव्हाण व छटाकी चव्हाण आणि फिर्यादीचे पती व भासरे यांना खाली पाडुन लाथाबुकयांनी मारहाण केली व शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिली. म्हणुन सदर घटनेबाबत फिर्यादीने पोलीस स्टेशन मंगरुळपीर येथे आरोपींविरुध्द रिपोर्ट दिला.

**३)** फिर्यादीच्या लेखी रिपोर्टवरून पोलीस स्टेशन अधिकारी मंगरूळपीर यांनी आरोपीं विरूध्द भा.दं.वि. कलम १४३,१४७,१४८,३२४, १४९,५०४,५०६ नुसार अपराध क्र.३५९/२०२२ अन्वये गुन्हा दाखल केला. गुन्ह्याचा तपास ना.पो.का रामराव अ. लडके यांनी केला व त्यांनी घटनास्थळावर जावून घटनास्थळ पंचनामा तयार केला. त्यानंतर त्यांनी फिर्यादी व साक्षीदारांचे बयाण नोंदविले आणि तपासांती

आरोपींविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

**४)** सदर न्यायालयाने आरोपीविरूध्द **<u>नि.क्र.२३</u>** वर भा.दं.वि. कलम १४३, १४७,१४८,३२४,५०४,५०६ सह कलम १४९ नुसार दोषारोप निश्चित केले. दोषारोप आरोपींना त्यांच्या मातृभाषेत वाचुन व समजावुन सांगण्यात आले. त्यांनी गुन्हा नाकबुल केला आणि संपरीक्षा घेण्याची मागणी केली. आरोपींविरूध्द आक्षेपार्ह पुरावा न आल्यामुळे त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

**५)** अभिलेखावर आलेल्या साक्षच्या अनुषंगाने व दोन्ही बाजुने केलेल्या युक्तीवादावरून खालील मुद्दे माझे समक्ष विचारार्थ उपस्थित होतात. मी माझा निष्कर्ष कारणासह त्यावर खालीलप्रमाणे नोंदवितो.

| अ.क्र. | मुदद् | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, फिर्यादमध्ये सांगीतल्याप्रमाणे दिनांक १२.०५.२०२२ रोजी दुपारी ४.०० वाजेच्या दरम्यान मंगरुळपीर येथे तुम्ही सर्व आरोपींनी बेकायदेशीर जमावाचे सदस्य होते आणि त्याद्वारे आरोपींनी भा.दं.वी.कलम १४३ सह कलम १४९ प्रमाणे गुन्हा केला? | ....नाही. |
| २ | दुसरे असे की, वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी बेकायदेशीर जमावाचे घटक राहून त्यांच्या समान उद्‌देश साधण्यासाठी दंगा केला आणि त्याद्वारे भा.दं.वी.कलम १४७ सह कलम १४९ प्रमाणे गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिद्ध करतो काय? | ....नाही. |
| ३ | तिसरे असे की, वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी बेकायदेशीर जमाव करून तुमच्या समान उद्‌देशासाठी जी वस्तू हल्ल्याचे हत्यार वापरून जी मृत्यूस कारण होणे संभवनीय आहे अशा प्रकारे लोखंडी गज व काठी या | ....नाही. |

| | | |
|---|---|---|
| | प्राण घातक वस्तूनिशी सज्ज होवून दंगा करून फिर्यादीचे पती, भासरे व नातेवाईक यांना मारले आणि भा.दं.वि.चे कलम १४८ प्रमाणे गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | |
| ४ | चौथे असे की, वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी बेकायदेशिर जमावाचे घटक होवून त्यांच्या समान उददेशासाठी फिर्यादीचे पती, भासरे व नातेवाईक यांना लोखंडी गजाने व काठीने मारहाण करून इच्छापूर्वक दुखापत पोहोचविली आणि त्याद्वारे आरोपींनी भा.दं.वी.चे कलम ३२४ सह कलम १४९ प्रमाणे गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिद्ध केले काय? | ....नाही. |
| ५ | पाचवे असे की, वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी बेकादेशीर जमावाचे घटक होवून त्यांच्या समान उद्देशासाठी फिर्यादीस व तिच्या नातेवाईकांस शिवीगाळ करून जाणीवपुर्वक अपमानीत केले व तिला सार्वजनिक शांततेचा भंग करण्यास प्रक्षोभीत केले म्हणुन तुमचे विरूध्द भारतीय दंड विधान ५०४ सहकलम १४९ प्रमाणे गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय? | ....नाही. |
| ६ | शेवटी असे की, वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी बेकायदेशिर जमावाचे घटक होवून त्यांच्या समान उद्देशासाठी फिर्यादीस व तिच्या नातेवाईकांस जिवे मारण्याची धमकी देवून त्यांच्या मनात दहशत बसविली आणि त्याद्वारे तुम्ही भा.दं.वी.कलम ५०६ सहकलम १४९ प्रमाणे गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिद्ध करतो काय? | ....नाही. |
| ७ | अंतिम आदेश काय.? | अंतिम आदेशाप्रमाणे |

<u>**का र ण मि मां सा**</u>

**६)** आरोपींविरूध्द गुन्हा शाबीत करण्याकरिता अभियोग पक्षामार्फत ०५ साक्षीदार तपासण्यात आले. साक्षीदार क्र.०१ फिर्यादी, सौ. भारती घनश्याम राठोड हिची साक्ष नि.क्र.३४ वर नोंदविण्यात आली, सा.क्र.०२ मोतीराम लक्ष्मण चव्हाण, यांची साक्ष नि.क्र.३७ वर नोंदविली होती, सा.क्र.०३ छटाकी लक्ष्मण चव्हाण, यांची साक्ष नि. क्र.३८ वर नोंदविली, सा.क्र.०४ घनश्याम किसन राठोड यांची साक्ष नि.क्र.३९ वर नोंदविण्यात आली आणि सा.क्र.०५ राम किसन राठोड यांची साक्ष नि.क्र.४० वर नोंदविण्यात आली. तसेच निशाणी ३३ वर फिर्यादी व आरोपींची आपसी तडजोडीचा लेख दाखल केला आहे.

**७)** दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी वकील श्री. एम. जी. राउत यांचा युक्तीवाद ऐकला त्यांनी आरोपीला योग्य ती शिक्षा दयावी अशी विनंती केली. याउलट आरोपी तर्फे श्री. बी. एस. खडसे यांचा युक्तिवाद ऐकला. त्यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आरोपींविरूध्द सबळ पुरावा मिळून आलेला नसल्याने तसेच फिर्यादीची व आरोपीची न्यायालयाबाहेर आपसात तडजोड झाली असल्याने आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात यावी अशी विनंती केली.

<u>**मुद्दे क्रमांक ०१ ते ०६ करिता**</u>:—

**८)** उपरोक्त मुददा क्र.०१ ते ०६ एकमेकांशी संलग्नीत असल्याने चर्चेची पुनरावृत्ती टाळणेसाठी त्यावर एकत्रिरित्या खालील प्रमाणे विवेचन केले आहे. भारतीय दंड संहिता चे कलम १४३,१४७,१४८,३२४,५०४,५०६ अंतर्गत गुन्हा सिध्द करणे कामी अभियोग पक्षाने सिध्द करणे गरजेचे आहे की, आरोपी बेकायदेशीर जमावाचे सदस्य होते आणि त्यांच्याकडे प्राण घात हत्यारानिशी सज्ज होवून फिर्यादीचे पती, भासरे व नातेवाईक यांना इजा पोहोचविण्याचा आरोपींचा समान उददेश होता. तसेच आरोपींनी बेकायदेशीर जमावाने फिर्यादीचे पती, भासरे व नातेवाईक यांना मारहाण करून इच्छापूर्वक दुखापत पोहोचविली, अश्लील शिवीगाळ केली आणि जिवाने मारण्याची धमकी दिली हे अनुक्रमे सिध्द होणे गरजेचे आहे.

**९)** साक्षीदार क्र.०२ मोतीराम लक्ष्मण चव्हाण, सा.क्र.०३ छटाकी लक्ष्मण चव्हाण, सा.क्र.०४ घनश्याम किसन राठोड आणि सा.क्र.०५ राम किसन राठोड हे जखमी साक्षीदार असुन ते त्यांच्या पुराव्यात असे कथन करतात की, फिर्याद भारती राठोड ही त्यांची नातेवाईक आहे व सर्व आरोपी हे सुध्दा त्यांचे नातेवाईक आहे. त्यांची आरोपींसोबत बोलचाल झाली होती बोलचाली व्यतिरिक्त काहीही झालेले नाही आणि मारहाणीची कुठलीही घटना त्यांच्यामध्ये झालेली नाही. पोलीसांनी त्यांना दवाखान्यात नेले नव्हते आणि त्यांची घटनेबाबत चौकशी सुध्दा केलेली नाही. सदरचे वरील सर्व साक्षीदार हे सरकार पक्षास सहकार्य करत नसल्याने सरकारी वकीलांनी त्यांना उत्तरसूचक प्रश्नही विचारले परंतू त्यातूनही अभियोग पक्षास उपयुक्त असे काहीही आले नाही. परंतू साक्षीदारांनी उत्तरसूचक प्रश्नांची उत्तरे देताना मान्य केले की, आरोपी व त्यांनी प्रस्तुतचे प्रकरण आपसात न्यायालयाबाहेर मिटविले आहे. तसेच सदरची बाब ही निशाणी ३३ वरील आपसी तडजोड लेख आणि पुरावा बंद ची पुरसीस वरून स्पष्ट होते.

**१०)** फिर्यादी, साक्षीदार.क्र.०१ सौ. भारती घनश्याम राठोड हिने तिच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, ती सर्व आरोपींना ओळखते ते तिचे नातेवाईक आहे. घ टना ही एक वर्षापूर्वी दुपारी ४.०० ते ५.०० वाजताच्या सुमारास तिच्या घराच्या समोर घडली होती. सदर घटनेमध्ये सर्व आरोपी व तिचे पती, मोठे भासरे व सासु यांच्यामध्ये बोलचाल झाली होती. सदर बोलचाली नंतर तिचे पती, भासरा व भाउ हे मोटर सायकलने बाहेर गावी जात असतांना ते मोटर सायकलवरुन पडल्यामुळे त्यांना मार लागला होता. म्हणुन तिने रागाच्याभरात रिपोर्ट दिला होता. परंतु रिपोर्ट आणि प्रथम खबरी अहवालमधील मजकुर तिने नाकारला आहे. पुढे ती हे मान्य करते की, आरोपी व त्यांच्यामध्ये बोलाचाली शिवाय काहीही घडले नव्हते, त्यांना मारहाण झाली नव्हती. त्यांची व आरोपींची न्यायालया बाहेर आपसी तडतोड झाल्याचे सांगितले.

**११)** फिर्यादीने व आरोपींनी **<u>नि.क्र.३३</u>** वर आपसी तडजोड लेख दाखल केला व सदरचे प्रकरण आपसात तडजोड झाली आहे असे सांगून त्यांना याव्यतिरीक्त कोणताही साक्षीदार तपासावयाचा नाही असे सांगीतले म्हणून निशाणी ०१ वर

आदेश पारीत करून पुराव्याची बाजु बंद करण्यात आली. जरी अभियोग पक्षाने घटनास्थळ पंचनामा सिध्द केला असला तरी तो स्वतंत्र पंच तपासी अंमलदार साक्षीदारामार्फत सिध्द झालेला नाही.

**१२)** अभिलेखावर पुराव्याचे व कागदपत्रांचे अवलोकन केले. आरोपींविरूध्द भा.दं. वि.चे कलम १४३,१४७,१४८,३२४,५०४,५०६ सह कलम १४९ अंतर्गत गुन्हा सिध्द होईल असा कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही त्यामुळे सर्व आरोपी हे संशयाचा फायदा मिळण्यास व निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. तसेच अभिलेखावर आलेली आपसी तडजोड लेख निशाणी ३३ आणि पुरसीस वरून असे दिसुन येते की, आरोपी व फिर्यादी हे एकमेकांचे नातेवाईक आहेत व त्यांनी सदरचे प्रकरण आपसात न्यायालयाबाहेर मिटविले आहे. म्हणुन मी मुद्दा क्र.०१ ते ०६ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र.०७ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१) आरोपी नामे १) जितेंद्र लक्ष्मण चव्हाण, २) राज धमेंद्र चव्हाण, ३) राहुल धमेंद्र चव्हाण, ४) धमेंद्र लक्ष्मण चव्हाण, ५) चित्रा धमेंद्र चव्हाण, ६) पुजा जितेंद्र चव्हाण, सर्व रा. जुने सोनखास ता. मंगरूळपीर, जि. वाशिम. यांना भारतीय दंड विधान कलम १४३,१४७,१४८,३२४,५०४,५०६ सह कलम १४९ अन्वये या दंडनीय अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२) आरोपींचे जामीनकदबा व जातमुचलका रद्द करण्यात येत आहे.

३) सदर प्रकरणातील जप्त मुद्देमाल एक १२ एम.एम. चा गजाचा तुकडा त्याची लांबी ३४ इंच किं.अं.१० रुपये, एक १२ एम.एम. चा गजाचा तुकडा त्यांची लांबी २३ इंच किं.अं.१० रुपये, एक बांबुची काठी गोलाई ०१ इंच लांबी ४१ इंच किं.०० हे मुल्यहीन असल्यामुळे अपिल कालावधी संपल्यानंतर नष्ट करण्यात यावे.

४) प्रस्तुतचे प्रकरण आपसात तडजोड झाल्याने अपीलाची शक्यता नसल्याने फौ. प्र.सं. कलम ४३७—अ नुसार पूर्तता केलेली नाही.

५) (न्यायानिर्णय न्यायालयीन वेळेत व खुल्या कक्षात उद्घोषीत करण्यात आला.)

स्वा/—
(आर. एस. मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.२, मंगरूळपीर.जि.वाशिम.

दि.२७/०९/२०२३